INDIA PARTNER Dabur GROUP



# अविवा इन्कम सुरक्षा

AVIVA
Life Insurance

**अविवा इन्कम सुरक्षा - व्यक्तिगत नॉन-लिंक्ड असहभागी बचत जीवन विमा योजना**

अविवा मध्ये आम्हाला, तुम्ही तुमच्या कुटुंबियांना आजही आणि उद्याही सुखाचे जीवन देण्यासाठी जे प्रयत्न आणि कठोर मेहनत घेत आहात त्याची जाणीव आहे. सादर आहे अविवा इन्कम सुरक्षा, जीवन विमा तथा **बचत करणारी** योजना जी तुम्हाला नियमित मासिक पेआऊटसच्या माध्यमातून खात्रीशीर परतावा देते आणि तुम्हाला आर्थिक सहाय्य करते. तुमचा अकाली मृत्यू झाल्यास हे पेआऊटस तुमच्या कुटुंबियांना दिले जातात.

**अविवा इन्कम सुरक्षा - महत्त्वाचे फायदे**

- खात्रीशीर* मासिक मिळकत 10 किंवा 12 वर्ष
- जीवनाच्या टप्यातील गरजांनुसार मिळकतीची सोय करण्याची लवचिकता
- विमाधारकाचा मृत्यू झाल्यास, कुटुंबाला खात्रीशीर मिळकत
- चालू कर कायद्यांनुसार करलाभ

***मृत्यूच्या तारखेपर्यंत किंवा परिक्वतेच्या तारखेपर्यंत, ह्यापैकी जे लवकर होईल तोपर्यंत सर्व देय हप्ते भरण्याच्या अधिन राहून खात्रीशीर मासिक मिळकत देण्यात येईल.***

**अविवा इन्कम सुरक्षा- पात्रता**

| मापदंड | निकष |
|---|---|
| **प्रवेशाचे वय** | 18 ते 48 वर्ष (मागील वाढदिवस) |
| **परिपक्वतेचे वय** | 28 ते 65 वर्ष (मागील वाढदिवस) |
| **हप्ता प्रदत्य कालावधी** | 10 किंवा 12 वर्षे |
| **विलंब कालावधी** | 0 किंवा 3 किंवा 5 वर्षे |
| **पॉलिसीची मुदत** | पॉलिसीची मुदत ही हप्ता प्रदत्य कालावधी अधिक विलंब कालावधी इतकी असेल. |
| **पेआऊट कालावधी** | (see table below) |
| **हप्ता (किमान)** | प्रवेशाचे वेळी वय 18 ते 40 वर्षे: ₹36,000 दरसाल किंवा ₹3,000 दरमहा.<br>प्रवेशाचे वेळी वय 41 ते 48 वर्षे: ₹60,000 दरसाल किंवा ₹5,000 दरमहा.<br>कर काही असल्यास स्वतंत्रपणे आकारला जाईल |
| **हमी रक्कम** | **किमान हमी रक्कम** (see table below)<br>**कमाल हमी रक्कम**<br>मर्यादा नाही. कमाल हमी रक्कम ही मंडळाच्या मंजूर केलेल्या विमालेखन पॉलिसीनुसार असेल. |
| **हप्ता प्रदत्य वारंवारिता** | केवळ वार्षिक आणि मासिक.<br>मासिक पद्धतीसाठी, फक्त ECS/डायरेक्ट डेबिटला परवानगी आहे. |

पॉलिसीची मुदत:

| हप्ता प्रदत्य कालावधी (वर्षात) | विलंब कालावधी (वर्षांमध्ये) | पॉलिसीची मुदत (वर्षांमध्ये) |
|---|---|---|
| (1) | (2) | (3)= (1) + (2) |
| 10 | 0 | 10 |
| | 3 | 13 |
| | 5 | 15 |
| 12 | 0 | 12 |
| | 3 | 15 |
| | 5 | 17 |

पेआऊट कालावधी:

| हप्ता प्रदत्य कालावधी | पेआऊट कालावधी |
|---|---|
| 10 वर्षे | 10 वर्षे |
| 12 वर्षे | 12 वर्षे |

किमान हमी रक्कम:

| प्रवेशाचे वेळी वय 18 ते 40 वर्षे | प्रवेशाचे वेळी वय 41 ते 48 वर्षे |
|---|---|
| ₹6,84,000 | ₹1,140,000 |

**कृपया नोंद घ्या:**

1. लागू कर आणि उपकर हे चालू कर कायद्यानुसार हप्त्यांहून अधिक आकारण्यात येतील. कर कायद्यात बदल होऊ शकतात.
2. विलंब कालावधी हा हप्ता प्रदत्य कालावधी आणि पॉलिसीची मुदत यातील कालावधी आहे.

**अविवा इन्कम सुरक्षा - योजनेचे फायदे**

**परिपक्वता लाभ**

विमाधारक पॉलिसीच्या मुदतीच्या अखेरपर्यंत जिवंत राहिल्यास आणि सर्व देय हप्ते भरले असल्यास, पेआऊट कालावधी दरम्यान नियमित मासिक मिळकतीच्या स्वरूपात परिपक्वता हमी रक्कम देण्यात येईल. पहिला हप्ता परिपक्वतेच्या तारखेला देय असेल आणि बाकीचे हप्ते पेआऊट कालावधीच्या अखेरपर्यंत नंतरच्या प्रत्येक मासिक पॉलिसी वर्धापनाला देय असतील.

नियमित मासिक मिळकत = मासिक हप्ता$ X परिपक्वता लाभाचा गुणक

परिपक्वता लाभाचा गुणक हा खालील तक्त्यानुसार हप्ता प्रदत्य वारंवारितेचा आधार असेल.

| हप्ता प्रदत्य कालावधी वर्षांत | परिपक्वता लाभ गुणक | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ‘मासिक’ हप्ता वारंवारतेसाठी | | | ‘वार्षिक’ हप्ता वारंवारतेसाठी | | |
| | विलंब कालावधी (वर्षांत) | | | विलंब कालावधी (वर्षांत) | | |
| | 0 | 3 | 5 | 0 | 3 | 5 |
| 10 | 1.45 | 1.70 | 1.90 | 1.55 | 1.80 | 2.00 |
| 12 | 1.70 | 1.90 | 2.15 | 1.80 | 2.00 | 2.25 |

$हप्ता ही कर आणि अतिरिक्त हप्ता, काही असल्यास, ती वगळता असेल.

‘वार्षिक’ हप्ता च्या वारंवारितेसाठी, मासिक हप्ता = वार्षिकीकृत हप्ता ÷ 12

परिपक्वता हमी रकमेहून अधिक, नियमित मासिक मिळकतीच्या शेवटच्या हप्त्यासोबत वयाशी संबंधित खात्रीशीर अंतरिम लाभ देखील देय असेल.

पेआऊट कालावधीत विमाधारकाचा मृत्यू झाल्यास, नामनिर्देशित व्यक्तीला नियमिक मासिक मिळकतीचे बाकीचे नियमित हप्ते मिळणे सुरू राहील आणि नियमित मासिक मिळकतीच्या शेवटच्या हप्त्यासोबत खात्रीशीर अंतरिम लाभ देखील देय असेल.

**‘मासिक’ हप्ता प्रदत्य पद्धतीसाठी परिपक्वता लाभाचे उदाहरण:**

35 वर्षांचा एक पुरुष अविवा इन्कम सुरक्षा योजना खरेदी करतो. तो ₹5000 ची मासिक हप्ता भरण्याची निवड करतो. तो तीन वर्षांच्या विलंब कालावधीसह 10 वर्षांच्या हप्ता प्रदत्य कालावधीची निवड करतो. त्याची पॉलिसीची मुदत 13 वर्षे आहे (10 वर्षांची PPT अधिक 3 वर्षांचा विलंब कालावधी).

तो परिपक्वतेपर्यंत जिवंत राहिल्यास आणि सर्व देय हप्ते भरल्या असल्यास, त्याला परिपक्वतेच्या तारखेला नियमित मासिक मिळकतीचा (RMI) पहिला हप्ता ₹ 8,500 (=5000*1.7) मिळेल आणि 10 वर्षांच्या पेआऊट कालावधीत आरएमआयचे बाकीचे 119 हप्ते नंतरच्या प्रत्येक मासिक पॉलिसी वर्धापनाला देय असतील. खात्रीशीर अंतरिम लाभासह परिपक्वता लाभाचा शेवटचा हप्ता दिल्यानंतर पॉलिसी खंडित होईल.

### ‘वार्षिक’ हप्ता प्रदत्य पद्धतीसाठी परिपक्वता लाभाचे उदाहरण:

35 वर्ष वयाचा पुरुष अविवा इन्कम सुरक्षा योजना खरेदी करतो. तो ₹60,000 ची वार्षिक हप्ता भरण्याची निवड करतो. तो 3 वर्षांच्या विलंब कालावधीसह 10 वर्षांच्या हप्ता प्रदत्य कालावधीची निवड करतो. त्याचा पॉलिसीचा कालावधी 13 वर्ष आहे (PPT 10 वर्ष अधिक विलंब कालावधी 3 वर्ष).

तो परिपक्वतेपर्यंत जिवंत राहिल्यास आणि सर्व देय हप्ते भरले असल्यास, त्याला परिपक्वतेच्या तारखेला नियमित मासिक मिळकतीचा पहिला हप्ता ₹9,000 (=5000*1.8) मिळेल आणि 10 वर्षांच्या पेआऊट कालावधीत आरएमआयचे बाकीचे 119 हप्ते नंतरच्या प्रत्येक मासिक पॉलिसी वर्धापनाला देय असतील. खात्रीशीर अंतरिम लाभासह परिपक्वता लाभाचा शेवटचा हप्ता दिल्यानंतर पॉलिसी खंडित होईल.

### मृत्यू लाभ

पॉलिसीच्या कालावधीत विमाधारकाचा मृत्यू झाल्यास, मृत्यूच्या तारखेपर्यंत सर्व देय हप्ते भरले असल्यास, पेआऊट कालावधीत नियमित मासिक मिळकतीच्या स्वरूपात मृत्यू हमी रक्कम देण्यात येईल पहिला हप्ता मृत्यूच्या वेळी देण्यात येईल आणि बाकीचे हप्ते विमाधारकाच्या नंतरच्या प्रत्येक मासिक मृत्यूच्या तारखेला देण्यात येतील.

नियमित मासिक मिळकत = मासिक हप्ता$ X मृत्यू लाभाचा गुणक

मृत्यू लाभाचा गुणक हा खालील तक्त्यानुसार हप्ता प्रदत्य वारंवारितेचा आधार असेल.

| हप्ता प्रदत्य कालावधी वर्षांत | मृत्यू लाभाचा गुणक | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ‘मासिक’ हप्ता वारंवारतेसाठी | | | ‘वार्षिक’ हप्ता वारंवारतेसाठी | | |
| | विलंब कालावधी (वर्षांत) | | | विलंब कालावधी (वर्षांत) | | |
| | 0 | 3 | 5 | 0 | 3 | 5 |
| 10 | 1.90 | 2.10 | 2.30 | 2.20 | 2.40 | 2.60 |
| 12 | 2.10 | 2.30 | 2.50 | 2.40 | 2.60 | 2.80 |

$हप्ता ही कर आणि अतिरिक्त हप्ता, काही असल्यास, ती वगळता असेल.

‘वार्षिक’ हप्ता च्या वारंवारितेसाठी, मासिक हप्ता = वार्षिकृत हप्ता ÷ 12

*मृत्यू समयी हमी रक्कम ही ह्यापैकी जे सर्वाधिक असेल तितकी असेल:

a) वार्षिकृत हप्त्यांच्या 10 पट, किंवा

b) मृत्यूच्या तारखेला एकुण भरलेल्या हप्त्यांच्या 105%, किंवा

c) परिपक्वता हमी रक्कम, किंवा

d) मृत्यूसमयी खात्रीशीर देय निश्चित रक्कम

‘‘वार्षिकीकृत हप्ता’’ म्हणजे कर, रायडर हप्ते, विमालेखनानुसार अधिक हप्ते आणि मोडल हप्त्यांसाठी लोडिंग्स, काही असल्यास वगळता पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय हप्त्यांची रक्कम.

एकुण भरलेले हप्ते म्हणजे काही अधिक हप्ता, काही रायडर हप्ता आणि कर वगळता सर्व मिळालेल्या हप्त्यांची एकुण बेरीज आहे.

मृत्यू समयी हमी रकमेहून अधिक, नियमित मासिक मिळकतीच्या शेवटच्या हप्त्यासोबत, वयाशी संबंधित खात्रीशीर अंतरिम लाभ देय असेल.

### खात्रीशीर अंतरिम लाभ

| विमाधारकाच प्रवेशाचे वेळी वय इतके असेल | खात्रीशीर अंतरिम लाभ | |
|---|---|---|
| | जर वार्षिकीकृत हप्त्यांच्या < = ₹50,000 | जर वार्षिकीकृत हप्त्यांच्या > ₹50,000 |
| 18 वर्षे<br>30 वर्षे | एका वार्षिकीकृत hßVm* च्या 50% | एका वार्षिकीकृत hßVm* च्या 70% |
| 31 वर्षे<br>35 वर्षे | एका वार्षिकीकृत hßVm* च्या 40% | एका वार्षिकीकृत hßVm* च्या 65% |
| 36 वर्षे<br>40 वर्षे | एका वार्षिकीकृत hßVm* च्या 35% | एका वार्षिकीकृत hßVm* च्या 50% |
| 41 वर्षे<br>45 वर्षे | एका वार्षिकीकृत hßVm* च्या 10% | एका वार्षिकीकृत hßVm* च्या 20% |
| 46 वर्षे<br>48 वर्षे | एका वार्षिकीकृत hßVm* च्या 2% | एका वार्षिकीकृत hßVm* च्या 4% |

‘‘वार्षिकीकृत हप्ता’’ म्हणजे कर, रायडर हप्ते, विमालेखनानुसार अधिक हप्ते आणि मोडल हप्त्यांसाठी लोडिंग्स, काही असल्यास वगळता पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय हप्त्यांची रक्कम.

### ‘मासिक’ हप्ता प्रदत्य पद्धतीसाठी मृत्यू लाभाचे उदाहरण

35वर्ष वयाचा पुरुष अविवा इन्कम सुरक्षा योजना खरेदी करतो. तो ₹5,000 मासिक हप्ता भरण्याची निवड करतो.

**केस-1:** तो 10 वर्षाची हप्ता प्रदत्य मुदत आणि 3 वर्षांच्या विलंब कालावधीची निवड करतो. त्याच्या पॉलिसीची मुदत 13 वर्ष आहे (PPT 10 वर्ष अधिक विलंब कालावधी 3 वर्ष). त्याचा 6व्या पॉलिसी वर्षात मृत्यू झाल्यास आणि मृत्यूच्या तारखेपर्यंत सर्व देय हप्ते भरले असल्यास, त्याच्या दावा करणाऱ्या व्यक्तीला ₹10,500च्या (=5000*2.10) नियमित मासिक मिळकतीचा पहिला हप्ता ताबडतोब देण्यात येईल (कंपनीद्वारा दावा स्वीकारण्यात आल्यानंतर) आणि 10 वर्षांच्या पेआऊट कालावधीत RMIचे बाकीचे 119 हप्ते नंतरच्या प्रत्येक मासिक मृत्यूच्या तारखेला देय असतील. खात्रीशीर अंतरिम लाभासह मृत्यू लाभाचा शेवटचा हप्ता दिल्यानंतर पॉलिसी खंडित होईल.

**केस-2:** तो 10 वर्षाची हप्ता प्रदत्य मुदत आणि 5 वर्षांच्या विलंब कालावधीची निवड करतो. त्याच्या पॉलिसीची मुदत 15 वर्ष आहे (PPT 10 वर्ष अधिक विलंब कालावधी 5 वर्ष). त्याचा 11व्या पॉलिसी वर्षात मृत्यू झाल्यास आणि मृत्यूच्या तारखेपर्यंत सर्व देय हप्ते भरले असल्यास, त्याच्या दावा करणाऱ्या व्यक्तीला ₹11,500च्या (=5000*2.30) नियमित मासिक मिळकतीचा पहिला हप्ता ताबडतोब देण्यात येईल (कंपनीद्वारा दावा स्वीकारण्यात आल्यानंतर) आणि 10 वर्षांच्या पेआऊट कालावधीत बाकीचे 119 हप्ते नंतरच्या प्रत्येक मासिक मृत्यूच्या तारखेला देय असतील. खात्रीशीर अंतरिम लाभासह मृत्यू लाभाचा शेवटचा हप्ता दिल्यानंतर पॉलिसी खंडित होईल.

### ‘वार्षिक’ हप्ता प्रदत्य पद्धतीसाठी मृत्यू लाभाचे उदाहरण:

35 वर्ष वयाचा पुरुष अविवा इन्कम सुरक्षा योजना खरेदी करतो. तो ₹60,000 वार्षिक हप्ता भरण्याची निवड करतो.

**केस-1:** तो 10 वर्षाची हप्ता प्रदत्य मुदत आणि 3 वर्षांच्या विलंब कालावधीची निवड करतो. त्याच्या पॉलिसीची मुदत 13 वर्ष आहे (PPT 10 वर्ष अधिक विलंब कालावधी 3 वर्ष). त्याचा 6व्या पॉलिसी वर्षात मृत्यू झाल्यास आणि मृत्यूच्या तारखेपर्यंत सर्व देय हप्ते भरले असल्यास,

त्याच्या दावा करणाऱ्या व्यक्तीला ₹12,000च्या {(=60000÷12)*2.40} इतका RMI चा पहिला हप्ता ताबडतोब देण्यात येईल (कंपनीद्वारा दावा स्वीकारण्यात आल्यानंतर) आणि 10 वर्षांच्या पेआऊट कालावधीत RMI चे बाकीचे 119 हप्ते नंतरच्या प्रत्येक मासिक मृत्यूच्या तारखेला देय असतील. खात्रीशीर अंतरिम लाभासह मृत्यू लाभाचा शेवटचा हप्ता दिल्यानंतर पॉलिसी खंडित होईल.

**केस-2:** तो 10 वर्षांची हप्ता प्रदत्य मुदत आणि 5 वर्षांच्या विलंब कालावधीची निवड करतो. त्याच्या पॉलिसीची मुदत 15 वर्ष आहे (PPT 10 वर्ष अधिक विलंब कालावधी 5 वर्ष). त्याचा 11व्या पॉलिसी वर्षात मृत्यू झाल्यास आणि मृत्यूच्या तारखेपर्यंत सर्व देय हप्ते भरले असल्यास, त्याच्या दावा करणाऱ्या व्यक्तीला रु.13,000च्या {(=60000÷12)*2.60} RMI चा पहिला हप्ता ताबडतोब देण्यात येईल (कंपनीद्वारा दावा स्वीकारण्यात आल्यानंतर) आणि 10 वर्षांच्या पेआऊट कालावधीत बाकीचे 119 हप्ते नंतरच्या प्रत्येक मासिक मृत्यूच्या तारखेला देय असतील. खात्रीशीर अंतरिम लाभासह मृत्यू लाभाचा शेवटचा हप्ता दिल्यानंतर पॉलिसी खंडित होईल.

**रद्द होणे / पुनरुज्जीवन / सरेंडरची तरतूद**

**किमान दोन वर्षांच्या हप्ते भरले नसल्यास:**

- पहिल्या 2 पॉलिसी वर्षाच्या दरम्यान, सवलत कालावधी संपण्याच्या अगोदर देय हप्ता भरले नसल्यास, पॉलिसी रद्द होईल.
- पहिल्या न भरलेल्या हप्त्यांच्या तारखेपासून पाच वर्षांच्या आत (पुनरुज्जीवन कालावधी) रद्द झालेली पॉलिसी पुनरुज्जीवित न केल्यास, हप्त्यांची 50% रक्कम दिल्यानंतर (कर आणि अधिक हप्ता, काही असल्यास वगळता) पॉलिसी खंडित होईल.
- रद्द झालेल्या पॉलिसी अंतर्गत, पुनरुज्जीवन कालावधीत मृत्यू झाल्यास, मृत्यूच्या तारखेपर्यंत एकुण भरलेल्या हप्त्यांच्या 100% रक्कम परत करण्यात येईल आणि पॉलिसी खंडित होईल.
- इतर कोणतेही लाभ देय नसतील.

एकुण भरलेले हप्ते म्हणजे एकुण प्राप्त सर्व हप्त्यांची रक्कम, कोणत्याही अधिक हप्ता, कोणत्याही रायडर हप्ता आणि कर वगळता.

**किमान दोन वर्षांच्या हप्ते भरले असल्यास:**

किमान 2 वर्षांच्या हप्ते भरल्यानंतर, त्यानंतर सवलत कालावधी संपण्यापुर्वी जर काही देय हप्ते भरले नसतील तर पॉलिसी खालील फायद्यांसह प्रदत्य पॉलिसी होईल:

$$\text{प्रदत्य मृत्यू हमी रक्कम} = \frac{\text{एकुण भरलेल्या हप्त्यांची संख्या}}{\text{एकुण देय हप्त्यांची संख्या}} \times \text{मृत्यू हमी रक्कम}$$

$$\text{प्रदत्य परिपक्वता हमी रक्कम} = \frac{\text{एकुण भरलेल्या हप्त्यांची संख्या}}{\text{एकुण देय हप्त्यांची संख्या}} \times \text{परिपक्वता हमी रक्कम}$$

कमी झालेला प्रदत्य लाभ खालील पद्धतीने देय असेल:

प्रदत्य केलेल्या पॉलिसी अंतर्गत पॉलिसीधारकाचा पॉलिसीच्या कालावधीत मृत्यू झाल्यास किंवा पॉलिसीच्या कालावधी अखेरपर्यंत जिवंत राहिल्यास, पेआऊट कालावधीत त्या प्रमाणात कमी केलेली नियमित मासिक मिळकत देय असेल.

- प्रदत्य केलेल्या पॉलिसी अंतर्गत मृत्यूसमयी / परिपक्वतेला कमी झालेली नियमित मासिक मिळकत खालील प्रमाणे असेल:

$$\text{मूळ मृत्यू किंवा परिपक्वता लाभाचा गुणक} \times \frac{\text{एकूण भरलेल्या हप्ता ची संख्या}}{\text{\$ एकूण देय हप्ता ची संख्या}} \times \text{मासिक हप्ता}$$

वार्षिक हप्ता वारंवारतेसाठी, मासिक हप्ता

= वार्षिकीकृत हप्ता ÷ 12

''वार्षिकीकृत हप्ता'' म्हणजे कर, रायडर हप्ते, विमालेखनानुसार अधिक हप्ते आणि मोडल हप्त्यांसाठी लोडिंग्स, काही असल्यास वगळता पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय हप्त्यांची रक्कम.

याव्यतिरिक्त, शेवटच्या हप्त्यासोबत वयाशी संबंधित त्याप्रमाणात खात्रीशीर अंतरिम लाभ देखील देय असेल.

**पुनरुज्जीवन:**

पॉलिसीधारकाला पहिल्या न भरलेल्या देय हप्त्यांच्या तारखेपासून (FUP) रद्द झालेली / प्रदत्य पॉलिसी पुनरुज्जीवित करण्यासाठी पाच वर्षांचा कालावधी असेल. पॉलिसीधारकाला कंपनीच्या विद्यमान मंडळाने मंजूर केलेल्या विमालेखन पॉलिसीनुसार, कंपनीचे समाधान होईल अशा प्रकारे विमाधारकाच्या निरंतर विमायोग्यतेचा पुरावा सादर करावा लागेल जे पुनरुज्जीवन करण्याची रक्कम आणि पुनरुज्जीवन शुल्कासह विलंब कालावधीसाठी सर्व देय हप्ते अधिक विलंब कालावधीसाठी न भरलेल्या देय हप्त्यांवरील व्याजाची रक्कम भरण्याच्या अधीन असेल. पुनरुज्जीवन शुल्क ₹250 अधिक कर, काही असल्यास, आकारण्यात येणारा व्याजाचा दर द.सा. 9% मासिक चक्रवाढ दराने, अधिक कर, काही असल्यास, इतका असेल. पॉलिसीची मुदत संपल्यानंतर प्रदत्य पॉलिसी पुनरुज्जीवित करता येणार नाही.

**सरेंडर मूल्य (SV)**

किमान दोन वर्षाच्या हप्ते भरले असल्यास, कोणत्याही वेळी पॉलिसी सरेंडर करता येईल. देय सरेंडर मूल्य हे खात्रीशीर सरेंडर मूल्य आणि विशेष सरेंडर मूल्य ह्यापैकी जे अधिक असेल तितके असेल.

**खात्रीशीर सरेंडर मूल्य:**

खात्रीशीर सरेंडर मूल्य खालील तक्त्यानुसार असेल:

| सरेंडरचे पॉलिसी वर्ष | एकुण प्रीमियमची भरपाई म्हणून दिलेली सरेंडर मूल्य* | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हप्ता कालावधी = 10 वर्ष | | | हप्ता कालावधी = 12 वर्ष | | |
| | विलंब कालावधी | | | विलंब कालावधी | | |
| | 0 | 3 | 5 | 0 | 3 | 5 |
| 1 | - | - | - | - | - | - |
| 2 | 50% | 50% | 50% | 50% | 50% | 50% |
| 3 | 50% | 50% | 50% | 50% | 50% | 50% |
| 4 | 50% | 50% | 50% | 50% | 50% | 50% |
| 5 | 50% | 50% | 50% | 50% | 50% | 50% |
| 6 | 50% | 50% | 50% | 50% | 50% | 50% |
| 7 | 50% | 50% | 50% | 50% | 50% | 50% |
| 8 | 65% | 55% | 55% | 60% | 50% | 50% |
| 9 | 90% | 60% | 60% | 70% | 50% | 50% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 10 | 90% | 68% | 65% | 80% | 55% | 55% |
| 11 | | 78% | 70% | 90% | 65% | 60% |
| 12 | | 90% | 75% | 95% | 75% | 68% |
| 13 | | 90% | 80% | | 80% | 70% |
| 14 | | | 90% | | 90% | 75% |
| 15 | | | 90% | | 90% | 80% |
| 16 | | | | | | 90% |
| 17 | | | | | | 90% |

एकुण भरलेल्या हप्ते म्हणजे काही अधिक हप्ता, काही रायडर हप्ता आणि कर वगळता सर्व मिळालेल्या हप्त्यांची एकुण बेरीज आहे.

**विशेष सरेंडर मूल्य:**
विशेष सरेंडर मूल्य हे इतके असेल:

विशेष सरेंडर मूल्याचा घटक x प्रदत्य केलेले मूल्य

प्रदत्य मूल्य= प्रदत्य परिपक्वता हमी रक्कम + प्रमाणबद्ध (N/T) वयाशी संबंधित खात्रीशीर अंतरिम लाभ.

ज्यामध्ये N म्हणजे भरलेल्या हप्त्यांची संख्या आणि T म्हणजे पॉलिसी अंतर्गत एकुण देय हप्त्यांची संख्या.

IRDA ऑफ इंडियाच्या पूर्व मंजुरीने कंपनीद्वारा वेळोवेळी विशेष सरेंडर मूल्य घटकाचा आढावा (SSV) घेतला जाऊ शकतो.

**महत्त्वाचे नियम व अटी**

**करलाभ**
करलाभ हे आयकर कायदा, 1961 मधील कलम 80C आणि 10(10(D)) नुसार असतील. कर लाभ हे चालू कर कायद्यांनुसार असतील आणि त्यात वेळोवेळी बदल होऊ शकतात.

**सवलत कालावधी**
''सवलत कालावधी'' म्हणजे आम्ही कोणताही दंड न आकारला जाता किंवा विलंब शुल्क न भरावे लागता, हप्ता भरण्यासाठी देय तारखेपासून दिलेला कालावधी, ज्या दरम्यान पॉलिसीच्या नियम व अटींनुसार कोणताही खंड न पडता जोखीम संरक्षणासह पॉलिसी कार्यान्वित असल्याचे समजले जाते. हप्ता भरण्यासाठी सवलत कालावधी वार्षिक पद्धतीसाठी 30 दिवस आणि मासिक पद्धतीसाठी 15 दिवस असेल.

**नामांकन आणि नेमणुक:**
विमा कायदा, 1938 मधील कलम 39, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, यात व्याख्या केल्यानुसार ह्या पॉलिसी अंतर्गत नामांकन करण्याची परवानगी आहे.

विमा कायदा, 1938 मधील कलम 38, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, यात व्याख्या केल्यानुसार ह्या पॉलिसी अंतर्गत नेमणुक करण्याची परवानगी आहे.

**कर्ज**
अविवाद्वारा ह्या पॉलिसी अंतर्गत कोणतेही कर्ज दिले जाणार नाही.

**मोफत पाहणी कालावधी**
तुम्हाला मोफत पाहणी कालावधीत पॉलिसीच्या नियम व अटींचा आढावा घेण्याचा अधिकार आहे जो पॉलिसीचे दस्तऐवज पाप्त झाल्याच्या तारखेपासून 15 दिवस (इलेक्ट्रॉनिक पॉलिसीज आणि दूरस्थ विपणनाद्वारे घेतलेल्या पॉलिसीजसाठी 30 दिवस) आहे. तुम्हाला कोणतेही नियम किंवा अटी मान्य नसल्यास तुम्ही तुमच्या हरकतीचे कारण नमूद करून पॉलिसी परत करू शकता.

तुम्ही मोफत पाहणी कालावधीत रद्द करण्यासाठी पॉलिसी परत केल्यास, वैद्यकीय तपासणीवर केलेला खर्च (काही असल्यास), संरक्षणाच्या कालावधीसाठी प्रमाणबद्ध जोखीम हप्ता आणि मुद्रांक शुल्क वजा करून आम्ही मिळालेल्या हप्त्यांची रक्कम (व्याजाशिवाय) परत करू.

**आत्महत्येच्या दाव्याची तरतूद आणि वगळण्याचे मुद्दे (काही असल्यास)**
पॉलिसी अंतर्गत जोखीम सुरू झाल्याच्या तारखेपासून किंवा पॉलिसीच्या पुनरूज्जीवनाच्या तारखेपासून 12 महिन्यांचे आत, लागू असेल त्याप्रमाणे, विमित व्यक्तीचा आत्महत्येद्वारे मृत्यू झाल्यास, पॉलिसी कार्यान्वित असल्यास, पॉलिसीधारकाची नामनिर्देशित व्यक्ती किंवा लाभधारक हे मृत्यूच्या तारखेपर्यंत एकुण भरलेल्या प्रिमियमच्या किमान 80% किंवा मृत्यूच्या तारखेला उपलब्ध असलेले सरेंडर मूल्य, ह्यापैकी जे अधिक असेल तितकी रक्कम मिळण्यास पात्र असेल.

**रायडर्स**
ह्या योजनेत कोणतेही रायडर्स उपलब्ध नाहीत.

**स्वीकृती**
संपूर्ण जोखीम आणि प्रिमियमची रक्कम स्वीकारल्याशिवाय अविवा कोणत्याही दाव्यास जबाबदार नसेल.

**विमा कायदा 1938 मधील कलम 41**
विमा कायदा 1938 मधील कलम 41 मधील तरतुदी, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, लागू असतील. चालू तरतुदींनुसार :

(1) विमा कायदा, 1938 मधील कलम 41 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे (1) कोणीही व्यक्ती भारतातील जीवन किंवा मालमत्ता ह्याच्याशी संबंधित जोखमींच्या संदर्भात विमा काढण्यासाठी किंवा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी किंवा तो सुरू ठेवण्यासाठी कोणाही व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणतेही आमिष देण्याची परवानगी देणार नाही किंवा परवानगी देऊ करणार नाही, देय कमीशनमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही हिस्यात किंवा पॉलिसीवर दर्शविण्यात आलेल्या हप्त्यात, कोणतीही सूट देऊ करणार नाही, किंवा पॉलिसी घेणारी, किंवा तिचे नूतनीकरण करणारी किंवा ती सुरु ठेवणारी कोणीही व्यक्ती विमा कंपनीच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीपत्रकानुसार किंवा तक्त्यानुसार परवानगी असलेल्या देण्यात येणाऱ्या सूट व्यतिरिक्त, कोणतीही सूट स्वीकारणार नाही.

(2) ह्या कलमाच्या तरतुदींची पूर्तता करण्याच्या बाबतीत कोणाही व्यक्तीने काही हलगर्जीपणा केल्यास, दंड आकारला जाईल जो रू. दहा लाख पर्यंत वाढविला जाऊ शकतो.

**विमा कायदा 1938 मधील कलम 45**
विमा कायदा 1938 मधील कलम 45 मधील तरतुदी, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, ह्या कंत्राटाला लागू असतील.

**अविवाबद्दल**
अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड ही डाबर इन्व्हेस्ट कॉर्पोरेशन आणि अविवा इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेड - यूके (UK) तील विमा कंपनी यांचा संयुक्त उपक्रम आहे ज्यांचा भारताशी 1834 पासून संबंध आहे. अविवा लाईफ इन्शूरन्सची निवड केल्यास तुम्हाला जगातील एका सर्वाधिक जुन्या विमा समुहाचा व्यवस्थापनाच्या अनुभवाचा लाभ मिळतो ज्यांना 1696 पासूनचा इतिहास आहे.

1884 साली स्थापन करण्यात आलेली डाबर इंडिया लिमिटेड ही डाबर समुहाची एक प्रमुख कंपनी आहे आणि भारतातील सर्वात जुनी व सर्वाधिक मोठ्या कंपन्यांपैकी एक कंपनी आहे. ही देशातील पारंपारिक आरोग्यसेवा उत्पादनाची एक अग्रणी उत्पादक कंपनी आहे.

**चौकशी आणि तक्रारी:**

अधिक माहिती, चौकशी आणि तक्रारीसाठी,
कृपया आमच्याशी खालील क्रमांकांवर संपर्क साधा:

1800-103-7766 (BSNL/MTNL ग्राहकांसाठी टोल फ्री) किंवा
0124-2709046 किंवा 5676737 वर "Aviva" SMS करा.

फॅक्स क्रमांक.: 0124-2709007

AVIVA | Life Insurance |

*डाबर इन्व्हेस्ट कॉर्पो. आणि*
*अविवा इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेड यांचा संयुक्त उपक्रम*


**अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड**

**मुख्य कार्यालय:** अविवा टॉवर, सेक्टर रोड, गोल्फ कोर्ससमोर,
DLF फेज-V, सेक्टर 43, गुरगाव-122003, हरयाणा, भारत.
फोन क्र.: +91 124-2709000, फॅक्स क्र.: +91 124-2571210
हेल्पलाइन क्र.: 1800-180-22-66/1800-103-77-66

वेबसाईट: www.avivaindia.com
ई-मेल: customerservices@avivaindia.com

**नोंदणीकृत कार्यालय:** 2रा मजला, प्रकाशदीप बिल्डिंग,
7, टॉल्स्टॉय मार्ग, नवी दिल्ली-110001, भारत.


खोटे फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा IRDA द्वारा जनतेस स्पष्टिकरण देण्यात आहे की : • IRDA किंवा त्यांचे अधिकारी कोणतीही विमा किंवा आर्थिक उत्पादनांच्या विक्रीत सहभागी होत नाहीत किंवा हप्त्याची गुंतवणूक करत नाहीत. • IRDA द्वारा कोणत्याही प्रकारच्या बोनसची घोषणा करण्यात येत नाही. अशा प्रकारचे कॉल्स स्वीकारणाऱ्या जनतेस दूरध्वनी क्रमांकाचा तपशिल, क्रमांक अशा माहितीच्या तपशिलासह त्या संबंधात पोलीसात तक्रार करण्याची विनंती करण्यात येत आहे.

अविवा इन्कम सुरक्षा - व्यक्तिगत नॉन-लिंक्ड असहभागी बचत जीवन विमा योजना. वर प्रदर्शित करण्यात आलेले ट्रेड लोगोज हे अविवा ब्रँडस लिमिटेड यांचे आहेत आणि अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड द्वारा त्यांचा परवान्यांतर्गत उपयोग करण्यात येत आहे. जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधी अधिक माहितीसाठी कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी विक्रीची माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा. कर लाभ हे चालू कर कायद्यांनुसार आहेत ज्यात बदल होऊ शकतात. IRDA ऑफ इंडिया नोंदणी क्रमांक: 122, नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता: 2 रा मजला, प्रकाशदीप बिल्डिंग, 7, टॉल्स्टॉय मार्ग, नवी दिल्ली-110001, भारत. कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN): U66010DL2000PLC107880, ई-मेल: Id: customerservices@avivaindia.com, दूरध्वनी क्रमांक: 0124 - 2709000, फॅक्स क्र.: 0124 - 2571210, टोल फ्री क्र.: 1800-103-7766/1800-103-8000. वेबसाईट: www.avivaindia.com, UIN: 122N133V01, Advt. No.: Nov 41/19.